# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - १२/१०/२०२४**

## जोगेश्वरी, गोवंडी, बांद्रा परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाईत १११ ग्रॅम 'कोकेन' व ५६५ 'कोडेन मिश्रीत बॉटस्' अंदाजे किं.रू. ४७ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करत परकीय नागरीकासह तीन ड्रग्ज तस्करांना केले जेरबंद.

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) गु.र.क्र. ६१/२०२४, कलम ८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ सह कलम १४ (ए), (बी) परदेशी नागरीक कायदा **(आझादमैदान युनिट)**<br>२) गु.र.क्र. ६२/२०२४, कलम ८(क) सह २२(क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ सह कलम ४, २५ भा.ह.का. **(घाटकोपर युनिट)**<br>३) गु.र.क्र. ६३/२०२४, कलम ८(क) सह २२(क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ **(कांदिवली युनिट)** |
| **दाखल दिनांक** | दिनांक १०/११/२०२४ ते १२/१०/२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) जोगेश्वरी, मुंबई, २) गोवंडी, मुंबई, ३) बांद्रा, मुंबई |
| **आरोपी** | १) परदेशी नागरीक रिचर्ट कोम्मे, वय-३४ वर्षे, मुळ रा. नैरोबी, केनिया<br>२) इसम नामे अरबाज उर्फ जब्बार, वय २६ वर्षे, रा. शिवाजीनगर, गोवंडी<br>३) इसम नामे इम्रान, वय २७ वर्षे, रा. शिवाजीनगर, गोवंडी<br>**एकूण ०३ आरोपी.** |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण १११ ग्रॅम वजनाचा 'कोकेन' अं.किं. रूपये ४४,४०,३०० लाख रूपये /-<br>२) एकुण ५६५ कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स् अंदाजे किंमत रु. २,८७,५००<br>**एकूण ४७,२७,८००/- रूपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त.** |

**(१) <u>जोगेश्वरी, मुंबई परिसरातून १११ ग्रॅम वजनाचा 'कोकेन' जप्त -</u>**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे आझादमैदान युनिटने दिनांक १०/१०/२०२४ रोजी जोगेश्वरी, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे 'कोकेन' विक्री करणाऱ्या परकिय नागरीक रिचर्ट कोम्मे, वय-३४ वर्षे, रा. केनिया ताब्यात घेतले. आरोपीचे ताब्यातून एकूण १११ ग्रॅम वजनाचा 'कोकेन' किंमत अंदाजे रूपये ४४.४० लाख रूपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद गुन्हयाचा पुढील तपास आझादमैदान युनिट करत आहे.

**(२) <u>गोवंडी, मुंबई व खेरवाडी, बांद्रा, मुंबई परिसरातून ५६५ 'कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स्' जप्त -</u>**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे कांदिवली युनिटने दिनांक १२/१०/२०२४ रोजी बांद्रा, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवेधपणे कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स विक्री करणाऱ्या इसम नामे अरबाज उर्फ जब्बार, वय २६ वर्षे, रा. गोवंडी ताब्यात घेतले. नमुद आरोपींचे ताब्यातून ४७७ कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स किंमत अंदाजे रूपये २.३८ लाख रूपये पेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद गुन्हयाचा पुढील तपास कांदिवली युनिट करत आहे.

तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे घाटकोपर युनिटने दिनांक ११/१०/२०२४ रोजी देवनार, गोवंडी मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स विक्री करणाऱ्या इसम नामे अरबाज उर्फ जब्बार, वय २६ वर्षे, रा. गोवंडी यास ताब्यात घेतले. नमुद आरोपींचे ताब्यातून ८८ कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स किंमत अंदाजे रूपये ४९ हजार रूपये पेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद गुन्हयाचा पुढील तपास घाटकोपर युनिट करत आहे. असा एकुन ५६५ कोडेन मिश्रीत सिरप बॉटल्स एकुन किं.अं. २.८७ लाख रूपये पेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२४ मध्ये एकूण ६३ गुन्हे दाखल करत त्यामध्ये एकूण १३५ अंमली पदार्थ तस्करांना अटक केली असून, त्यांचे ताब्यातून एकूण ४५.११ कोटीपेक्षा अधिक किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात यश आले आहे. अशाप्रकारे बृहन्मुंबई पोलीस हे अंमली पदार्थ मुक्त समाज निर्मितीसाठी सतत प्रयत्नशिल आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, आझादमैदान युनिटचे प्रभारी पो.नि.श्री. राजेंद्र दहिफळे, कांदीवली युनिटचे प्रभारी पो.नि.श्री. वैभव धुमाळ, घाटकोपर युनिटचे प्र.पो.नि. श्री. भगवान बेले यांचे नेतृत्वाखाली अंमली विरोधी कक्ष पथकांनी केली आहे.

--/--